**ग्रामपंचायतीचे विभाजन / एकत्रिकरण किंवा त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यांबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यांबाबत मार्गदर्शक सुचना**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन परीपत्रक क्र. व्हीपीएम २६०६/प्र.क्र. ४२१५ /पंरा -४ (२२)**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दिनांक - २ सप्टेंबर, २००६**

वाचा-
१) शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३/प्र.क्र. १५४४ /परा-४(२२), दिनांक ११ फेब्रूवारी २००४
[redacted] परीपत्रक क्र. व्हीपीएम २६०५/प्र.क्र.४०३७ /परा-४(२२), दिनांक ८ एप्रिल २००५

भारत परिसीमन आयोगाने प्रशासकीय घटकांच्या हददीमध्ये कोणताही फेरफार अशवा बदल करण्यांस बंदी घातली होती. ही बंदी राज्यातील विधानसभा व लोकसभा मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतची अंतिम अधिसूचना प्रकाशित होईपर्यन्त चालू राहणार होती. भारत परिसीमन आयोगाने दिनांक ३१ जुलै, २००६ रोजी उपरोक्त अधिसूचना शासन राजपत्रात प्रकाशित केली असल्याने दिनांक १.८.२००६ पासून वरील बंदी आपोआप संपुष्टात आली आहे.

२. यास्तव आता ग्रामपंचायत विभाजन / एकत्रिकरण /किंवा त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्ताव विभार्गीय आयुक्त यांनी शासनास सादर करण्यांस हरकत नाही.

३. स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे अधिकार पूर्वी विभागीय आयुक्तांना होते. आता विभाजनाचे प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना शासनास सादर करावे लागतात. प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विभागीय आयुक्त यांना खालीलप्रमाणे सूचना / मार्गदर्शन दिल्या आहेत. या परिपत्रकाव्दारे सदर सूचना विभागीय आयुक्त यांच्या निदर्शनास पुन: एकदा आणण्यांत येत आहेत.

अ) <u>निकष व अटी -</u> स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे निकष दिनांक १२ फेब्रूवारी [redacted] च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यांत आले आहेत . <u>यास्तव प्रस्ताव सदर निकष व अटीनुसारच सादर करण्यांत यावा.</u> निकषात न बसणारे प्रस्ताव तात्काळ परत करण्यांत येऊन अर्जदारास त्याबाबत आपल्या स्तरावर कळविण्याची कार्यवाही करावी, जेणेकरुन भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवणार नाहीत .

ब) <u>महसूली गाव - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदींनुसार स्वतंत्र ग्रामपंचायतीचे क्षेत्र हे महसूली गाव जाहीर होणे आवश्यक आहे .</u> सदर गावालाच स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून घोषित करण्यांत येते. यास्तव सदर क्षेत्र महसूली गाव जाहीर केल्याबाबतची

अधिसूचना जोडणे आवश्यक आहे किंवा तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे. यास्तव प्रस्तावात सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रामपंचायतीच्या सर्व महसूली गावांची यादी व फेररचनेनंतर अस्तित्वात येणा-या प्रत्येक ग्रामपंचायतीची ग्रामपंचायत निहाय समाविष्ट होणा-या सर्व महसूली गावांची नांवे ( मराठी व इंग्रजीमध्ये ) नमूद करणे आवश्यक आहे.

क) गावक-यांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देणे - ग्रामपंचायतीचे विभाजन करतांना अनुसरावयाच्या विहित कार्यपध्दतीच्या सूचना दिनांक १२.१२.२००२ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय आयुक्त यांना देण्यांत आल्या आहेत. याप्रकरणी न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले असल्याने याबाबतची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे व तसे आपल्या प्रस्तावात प्रमाणित करणे आवश्यक आहे.

ड) ग्रामपंचायत व स्थायी समिती जिल्हा परिषद यांचा ठराव -मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुर्दीनुसार प्रस्तावासोबत *विद्यमान* ग्रामपंचायतीचा व *विद्यमान* स्थायी समिती जिल्हा परिषदेचा ठराव जोडणे आवश्यक आहे.

इ) मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त यांची शिफारस - प्रस्तावासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त यांची सुस्पष्ट शिफारस असणे आवश्यक आहे. सदर शिफारशीशिवाय प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. ही बाब लक्षात घ्यावी.

ई) प्रस्ताव शासनास सादर करण्याचा कालावधी - ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन ग्रामपंचायत गठीत झाल्यापासून २ वर्षापर्यन्त ग्रामपंचायतीचे विभाजन किंवा एकत्रिकरण करता येत नाही . तसेच ग्रामपंचायतीची मुदत संपायच्या अगोदर ६ महिन्यापासून निवडणूक प्रक्रिया सुरु होत असल्याने ग्रामपंचायतीचे विभाजन किंवा एकत्रिकरण करता येत नाही . तसेच आचारसंहितेच्या काळातही ग्रामपंचायतीचे विभाजन किंवा एकत्रिकरण करता येत नाही. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आपणास वेळोवेळी कळविण्यांत आले आहेत . ही बाब लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घेऊनच प्रस्ताव शासनास सादर करावेत.

च) प्रस्तावासोबतचे पत्र , कागदपत्रे व अनुक्रमणिका -

i) प्रस्ताव पाठवितांना प्रस्तावाची संपूर्ण माहिती देणारी प्रार्श्वभूमी (प्रस्तावाच्या सविस्तर कारणासह) पत्रात नमूद करणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रकरण असल्यास न्यायालयीन निर्णयाच्या प्रतीसह प्रार्श्वभूमी व शासनाकडून अपेक्षित कार्यवाही नमूद करणे आवश्यक आहे.

ii) प्रस्तावात आवश्यक असलेली *सर्व कागदपत्रे* जोडणे आवश्यक आहे. व ती कोणत्या पृष्ठावर आहेत हे सुरुवातीच्या अनुक्रमणिकेत नमूद करणे आवश्यक आहे.

iii) प्रपत्र-१ व प्रपत्र-२ प्रस्तावासोबतच्या पत्रासोबत स्वतंत्र जोडणे आवश्यक आहे.

छ) प्रपत्र १- प्रस्तावासोबत पाठवावयाच्या विहित प्रपत्राचा नमुना दिनांक २३.६.९८ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय आयुक्तांना पाठविण्यांत आला आहे . प्रस्तावासोबत सदर प्रपत्र ( दिनांक १२ फेब्रुवारी , २००४ चा शासन निर्णय विचारात घेऊन सदर प्रपत्रात आवश्यक ते बदल गृहीत धरावेत ) जोडणे आवश्यक आहे.

ज) प्रपत्र २ - ग्रामपंचायतीचे प्रस्ताव शासनास सादर करताना सोबत जोडलेले प्रपत्र जोडणे आवश्यक आहे .

झ) प्रस्तावाची मांडणी व बांधणी - प्रस्ताव शासनास सादर करताना कसा सादर करावा याबाबतच्या सूचना दिनांक ९.३.९८ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय आयुक्तांना व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांना देण्यांत आल्या आहेत. त्यानुसार प्रस्तावाची मांडणी व बांधणी घटट असावी , जेणेकरुन प्रस्तावातील कागदपत्रे सैल होऊन सुटी होणार नाहीत. यास्तव प्रस्ताव फाईल कव्हरमध्येच पाठविण्यांत यावा.

त) अर्जदारास कळविण्यांबाबत - प्रस्ताव निकषात बसत नसल्यास तात्काळ प्रस्ताव परत करण्यांत येऊन अर्जदारास तसे कळविण्यांत यावे. तथापि प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही स्तरावर प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत .

शासनास मोठया प्रमाणात ग्रामपंचायत स्थापनेचे प्रस्ताव प्राप्त होत असतात . या सर्व प्रस्तावांची छाननी करणे जिकिरीचे असते. यास्तव सदर प्रस्तावात कोणतीही त्रुटी राहू नये. याकरिता पुन: एकदा आपणास सूचना देण्यांत येत आहेत. यास्तव वरीलप्रमाणेच प्रस्ताव विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर करावेत. प्रस्ताव वरील प्रमाणे नमुन्यात व निकषात नसल्यास याची गंभीर दखल घेण्यात येऊन प्रस्ताव आपणांस परत करण्यांत येतील याची नोंद घ्यावी .( यास्तव प्रस्ताव पाठविण्यापूर्वी वरीलप्रमाणे चेकलिस्ट तयार करुन सादर करावेत.)

वरील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यावी, ही विनंती.

(सुनील चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी , महाराष्ट्र शासन .

प्रति,

विभागीय आयुक्त
( सर्व )

प्रत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व ) यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अ) प्रस्तुत प्रस्तावाची संपूर्ण छाननी करण्यांत आली असून प्रस्तुत प्रस्ताव शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३/ प्र.क्र. १५४४/पंरा -४ (२२ ) , दिनांक १२.२.२००४ नुसार व शासनाने वेळोवेळी या संदर्भात ठरविलेल्या निकष व अटी नुसार आहे. तसेच प्रस्तावित ग्रामपंचायतीचे क्षेत्र हे महसूली गाव जाहीर झालेले आहे. सबब प्रस्तुत ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यांस हरकत नाही .

ब) ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन ग्रामपंचायत गठीत झाल्यापासून २ वर्षापर्यन्त ग्रामपंचायतीचे विभाजन / एकत्रिकरण करता येणार नाही . तसेच ग्रामपंचायतीची मुदत संपायच्या अगोदर ६ महिन्यांपासून निवडणूक प्रक्रिया सुरु होते . यास्तव या कालावधीत ग्रामपंचायतीचे विभाजन किंवा एकत्रिकरण करता येणार नाही. तसेच आचार संहितेच्या काळातही ग्रामपंचायतीचे विभाजन किंवा एकत्रिकरण करता येत नाही . असे राज्य निवडणूक आयोगाचे स्पष्ट आदेश आहेत . ही बाब लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घेऊनच प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. यास्तव असे प्रमाणित करण्यांत येते की , "प्रस्तुत प्रस्ताव हा ग्रामपंचायतीच्या निवडणूका होऊन गठीत झाल्यापासून २ वर्षानंतर सादर करण्यांत आला आहे तसेच ग्रामपंचायतीची मुदत संपण्यास ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधी बाकी आहे. व राज्य:स्थितीत आचारसंहिता सदर प्रस्तावास लागू नाही . "

क) प्रस्तुत प्रस्ताव हा ग्रामस्थांच्या मागणी नुसार सादर करण्यांत आला आहे. तसेच प्रस्ताव शासनास सादर करण्यांपूर्वी सर्व ग्रामस्थाना पुरेशी कल्पना देण्यांत आलेली आहे असे प्रमाणित करण्यांत येते .

यास्तव , प्रस्ताव निकष व अटीनुसार असल्याने प्रस्ताव मान्य करण्यांस हरकत नसावी.

सही /-
( विभागीय आयुक्त , विभाग )

(सोबत शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक व्हीपीएम २००२/प्र.क्र.८३/ वित्त-८, दिनांक २७ जुलै, २००६ (महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा (सुधारणा) नियम २००६ ची प्रत.)

क्रमांकः व्हीपीएम २००२/प्र.क्र. ८३/वित्त-८
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक ४ ऑगस्ट, २००६

सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
विभागीय आयुक्त (सर्व)
सहाय्यक आयुक्त, (विकास) सर्व.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतींसह)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(जिल्ह्यातील गट विकास अधिका-यांना वितरीत करावयाच्या प्रतींसह)
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
निवड नस्ती, का.क्र.वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

(वि. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.